वागळे वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ २८८ /२०२५ दि. २९ /१२/२०२५

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये **वागळे** वाहतूक उपविभागाचे हद्दीत साठे नगर येथील महाराष्ट्र वॉच कंपनी समोरील साठे नगर कडुन इंदीरानगरकडे जाणाऱ्या रोडवर जलवाहीनी टाकण्यात येणार असुन त्या करीता मुख्य रत्स्त्याचे खोदकाम करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	**१)** २२ नं. सर्कल तसेच हनुमान नगर कडुन साठेनगर चौकातुन इंदिरा नगर कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **साठेनगर चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	साठे नगर, इंदिरा नगर, रुपादेवी परीसरातील सर्व वाहने ही साठेनगर चौकातुन उजवीकडे वळण घेवुन वागळे बस डेपो – हनुमान नगर – राम नगर येथुन डावीकडे वळण घेवुन पुढे २२ नं. सर्कल मार्गे इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२)** वागळे बस डेपा मधिल सर्व बसेस व साठे नगर परीसरातील सर्व प्रकारच्या वाहनांना **साठे नगर चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने ही हनुमान नगर – राम नगर कडुन डावीकडे वळण घेवुन पुढे २२ नं. सर्कल येथुन इच्छीत स्थळी जातील.
पर्यायी मार्ग –	२२ नं. सर्कल कडुन इंदिरा नगर कडे जाणारी सर्व वाहने ही नवीन पासपोर्ट ऑफिस समोरील कट येथुन इंदिरा नगर कडुन २२ नं. सर्कल कडुन येणाऱ्या रोडवरुन २ लेन पैकी एका लेनचा वापर करुन इंदिरा नगर कडे इच्छीत स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना **दिनांक ३०/१२/२०२५ रोजी पासुन ते दिनांक १५/०१/२०२५ रोजी** पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ व ५/वि.शा. ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबंधित सपोआ, वाहतूक विभाग, ठाणे शहर व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावी